जा.क्र.विकृससं/उशे-सशे/कृषि-३/ ६७७० /२०१८
विभागीय कृषि सहसंचालक, कोकण विभाग
ठाणे दि.२५/०९/२०१८

प्रति,
मा. कृषि संचालक(विस्तार व प्रशिक्षण),
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,
पुणे

विषय :- उन्नत शेती-समृध्द शेतकरी सन २०१८-१९ अंतर्गत रबी हंगामातील पिक उत्पादकता वाढीसाठी निश्चित केलेले उत्पादन वाढीचे तंत्रज्ञानाची माहिती कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ :- मा.कृषि संचालक(वि.प्र.),कृषि आयुक्तालय,यांचे कार्यालयाकडील पत्र कृआ /विप्र-३/उशे-सशे/४३१८/५०८,दि.१७.०९.२०१८

उन्नत शेती-समृध्द शेतकरी सन २०१८-१९ अंतर्गत कोकण विभागातील रब्बी हंगामातील प्रमुख पिकांसाठी निश्चित केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती तसेच उत्पादकता वाढविणेसाठी सर्व शेतक यांना तंत्रज्ञानाचा प्रसार करणेसाठी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांशी चर्चा करुन त्यांचे मार्गदर्शनानुसार तसेच शिफारशीसह अंतीम करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये सदरची माहिती कृषि विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेबाबतच्या सुचना आहेत. तरी सदरची माहिती कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती

सोबत - वरीलप्रमाणे

विभागीय कृषि सहसंचालक,
कोकण विभाग ठाणे

प्रत :- उपसंचालक(प्रकल्प), कृषि आयुक्तालय,पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर

# चवळी

- जमीन व पूर्व मशागत- चवळी पिकासाठी मध्यम ते भारी जमीन उपयुक्त आहे. उभी व आडवी नांगरट करून जमीन भुसभुशीत करावी व फळीने सम पातळीवर आणावी आणि रब्बी हंगामात उतारास आडव्या दिशेने योग्य ( ४ X ३ मी ) आकाराचे वाफे करून दोन वाफ्यामध्ये पाण्याचे पाट ठेवावेत. खरीप पिकासाठी उताराची व निचऱ्याची जमीन निवडावी.
- सुधारित जाती-

| जातीचे नाव | कालावधी(दिवस) | उत्त्पन्न |
|---|---|---|
| कोकण सदाबहार | ५०-५५ | १३-१४ |
| कोकण सफेद | ७०-८० | १४ |

- पेरणीची वेळ-

  खरीप हंगाम- १५ जुलै नंतर

  रब्बी हंगाम- १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर
- अंतर - ३० X १५ सें.मी
- बियाणे प्रमाण- हेक्टरी १५ ते १८ किलो
- बीज प्रक्रिया- पेरणीपूर्व १ किलो बियाण्यास २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची प्रक्रिया करून नंतर प्रति किलो २५ ग्रम प्रमाणे रोझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करून पेरणी करावी
- खते-पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे.
- पाणी व्यवस्थापन- ८-९ दिवसाच्या अंतराने ५-६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.
- तण नियंत्रण- तण उगवणी पूर्व ब्युटाक्लोर (१.५ किलो क्रियाशील घटक / हे) तण नाशक वापरावे किंवा १५ आणि ३० दिवसांनी निंदनी करून पिक तण मुक्त ठेवावे.

# कुळीथ

- जमीन व पूर्व मशागत- कुळीथ पिकासाठी हलकी ते मध्यम जमीन उपयुक्त आहे. उभी व आडवी नांगरट करून जमीन भुसभुशीत करावी व फळीने सम पातळीवर आणावी
- सुधारित जाती-

| जातीचे नाव | कालावधी(दिवस) | उत्पन्न |
| --- | --- | --- |
| दापोली | ९०-१०० | ७-८ |
| सीना | ११५-१२० | ८-९ |
| माण | १००-१०५ | ६-७ |

पेरणीची वेळ- १५ ऑक्टोबर ते नोव्हेंबर

- अंतर - ३० X १५ सें.मी
- बियाणे प्रमाण- हेक्टरी १८ ते २० किलो
- बीज प्रक्रिया- पेरणीपूर्व १ किलो बियाण्यास २.५ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची प्रक्रिया करून नंतर प्रति किलो २५ ग्रम प्रमाणे रोझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करून पेरणी करावी
- खते-पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद आणि पालाश ६० किलो द्यावे.
- आंतरमशागत- या पिकाला एक वेळ बेणणी आणि कोळपणी द्यावी.
- पिक संरक्षण- रस शोषणाऱ्या किडी आढळल्यास मोनोक्रोटोफोस प्रति लिटर पाण्यात १.२ मिली या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.
- कापणी- पेरणी नंतर साडेतीन महिन्यांनी हे पिक कापणीस तयार होते.शेंगा पिवळसर रंगाच्या दिसू लागताच व पाने वाळून गळण्यास सुरु झाल्यावर पिकाची काढणी सकाळच्या वेळी कापून करावी.

# कडवा वाल

- जमीन व हवामान  - मध्यम आणि गाळाच्या भारी जमिनीत वालाच्या पिकाची वाढ चांगली होते. पिकाच्या वाढीसाठी थंड हवामान मानवते . ढगाळ आणि दमट हवामानात पिकाची शाखीय वाढ अधिक होते
- सुधारित जाती-

  जातीचे नाव    कालावधी(दिवस)   उत्पन्न

  कोकण वाल १   १००-११०    १०-१२

  कोकण वाल-२   १००-१०५    १०-१२
- पेरणीची वेळ- खरीप भात पिक काढणी नंतर पेरणी करावी
- बियाणे प्रमाण- टोकन पद्धतीने - हेक्टरी ३०  ते ४५ किलो , पाभरीने - हेक्टरी ५०  ते ६० किलो
- अंतर- टोकन पद्धतीने - ३० X १५ सेमी /३० X २० सेंमी ३० X ३० सेंमी
- बीज प्रक्रिया- पेरणीपूर्व १ किलो बियाण्यास ३ ग्रम थायरम या बुरशीनाशकाची प्रक्रिया करून नंतर प्रति किलो २५ ग्रम प्रमाणे रोझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करून पेरणी करावी
- खते-पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे.
- तण नियंत्रण- वालामध्ये पिक उगवल्यानंतर हेक्टरी ५ टन गिरी पुष्पाच्या किंवा अन्य सुक्या पालाचे किंवा गवताचे आवरण करावे. पेरणी नंतर १५ दिवसांनी निंदनी करावी.पेरणी नंतर  उगवणी पूर्व ब्युटाक्लोर (१.५ किलो क्रियाशील घटक / हे) तण नाशक वापरावे या पिकातील अमरवेल या तणाचे प्रभावी नियंत्रण साठी शेत नांगरून प्रति हेक्टर १.००कि.ग्र. Pendimethalin हे तणनाशक उगवणी पूर्वी वाळू मध्ये मिसळून जमिनीवर फोकून टाकावे.

- कापणी- पिक सर्व साधारण १००      - ११० दिवसात काढणीस तयार होते.पिकाची काढणी दोन प्रकारे करतात. पहिल्या प्रकारात जस जश्या शेंगा वळतील वाळतील तसतशी शेंगाची तोडणी करतात. दुसऱ्या प्रकारात शेंगा झाडावर वाळे पर्यंत ठेवतात. शेंगा झाडावर वाळल्या नंतर पिकाची कापणी करतात.

# मुग

- जमीन व पूर्व मशागत- मुग पिकासाठी मध्यम ते भारी स्वरुपाची जमीन उपयुक्त आहे. उभी व आडवी नांगरट करून ढेकळे फोडून माती बारीक करावी. योग्य आकाराचे सपाट वाफे करून दोन वाफ्या मध्ये पाण्याचे पाट ठेवावेत.जमीन भुसभुशीत करावी व फळीने सम पातळीवर आणावी
- सुधारित जाती-

| जातीचे नाव | कालावधी (दिवस) | उत्त्पन्न |
|---|---|---|
| पुसा-वैशाखी | ७० | ८-१० |
| वैभव | ७०-७५ | १२-१४ |
| फुले एम-२ | ६०-६५ | १०-१२ |
| कोपरगाव | ७० | ७-८ |
| जळगाव-७८१ | ६०-६५ | ७-८ |
| टी.ए.पी-७ | ७० | ८-१० |

- पेरणीची वेळ- मुगाची लागवड उन्हाळी हंगामात करावी. कमी कालावधीचे पीक असल्याने जानेवारी ते फेब्रुवारीच्या दरम्यान मुगाची पेरणी करावी.
- अंतर - ३० X १० सें.मी
- बियाणे प्रमाण- हेक्टरी १५ ते २० किलो
- बीज प्रक्रिया- पेरणीपूर्व १ किलो बियाण्यास २.५ ग्रम प्रमाणे बुरशीनाशक आणि शेवटी पेरणीपूर्वी रायझोबियम जीवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.
- खते-पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद द्यावे.
- आंतरमशागत- पिकाची उगवण झाल्यानंतर नांगे भरावेत आणि विरळणी करून घ्यावी. साधारण २० ते २५ दिवसांनी बेणणी करावी. तसेच एक वेळ कोळपणी करावी.
- पिक संरक्षण- पाने खाणारी अळी, तुडतुडे, व मावा किडी आढळल्यास गरजेनुसार ६०० मि.ली. मोनोक्रोटोफोस प्रति लिटर पाण्यात १.२ मिली या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. मूळ कुजव्या आणि करपा रोगांचा प्रादुर्भाव आढळल्यास एक लीटर पाण्यात २.५ ग्रम कॉपर ऑक्सिक्लोराईड या प्रमाणात मिसळून फवारणी करावी.
- कापणी- पेरणी नंतर साधारणता ६० ते ७० दिवसांनी या पिकाच्या शेंगांची तोडणी करावी. शेंगांचा हिरवा रंग बदलून पिवळसर तपकिरी होऊ लागतो. उशिरा व कडक उन्हात तोडणी करू नये अन्यथा शेंगा तडकून उत्पादनात घट होते. शेंगांची तोडणी शक्यतो सकाळी करावी.

**हरभरा**

- जमीन व हवामान - हरभरा या पिकास मध्यम ते भारी (४० ते ४५ सें.मी.) पाण्याचा निचरा होणारी, कसदार, भुसभुशीत जमीन आवश्यक असते. हरभरा या पिकाची मुळे खोल जात असल्यामुळे जमीन भुसभुशीत असली पाहिजे त्याकरिता खरीपाचे पीक निघताच जमिनीची खोल २५ सें.मी. नांगरणी करावी.
- सुधारित जाती-

जातीचे नाव कालावधी(दिवस) उत्पन्न

जाकी ९२१८ लवकर परिपक्व १०० दाणे, २२-२६ ग्रम

विजय जिरायत ८५-९०

बागायत १०५-११०

ए.के.जी.४६ १००-१०५ १०० दाणे, २२-२४ ग्रम

काबुल वाण ११०-११५ १०० दाणे, ३५ ग्रम

जिरायत १०-१२ क्वी.

बागायत ३०-३२ क्वी.

श्वेता (आय.सी.सी.व्ही-२) जिरायत ८५-९० १०० दाणे, २२-२६ ग्रम.

बागायत १००-१०५

- पेरणीची वेळ- कोरडवाहू हरभर्याची पेरणी ऑक्टोंबरच्या पहिल्या पंधरवड्यात व बागायती हरभर्याची पेरणी २० ऑक्टोंबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी.
- बियाणे प्रमाण- लहान व मध्यम दाण्याचा वाणाकरिता ६० ते ६५ कि., टपोऱ्या दाण्याच्या वाणाकरिता १०० कि. प्रतिहेक्टरी.
- अंतर- काबुली हरभरा - ४५ X १० सेमी
- बीज प्रक्रिया- पेरणीपूर्व १ किलो बियाणास ३.ग्रम थायरम किंवा २ ग्रम बाविस्टीन चा वापर करावा.
- खते-पेरणीच्या वेळी प्रति हेक्टरी २५ किलो नत्र व ५०.किलो स्फुरद व ५०.किलो पालाश द्यावे. तसेच ५०.किलो स्फुरद प्रति हेक्टरी देणेकरीता १२५.किलो डी.ए.पी. अथवा ५०.किलो युरिया आणि २००.किलो सिंगल सुपर फोस्फेट द्यावे.
- तण नियंत्रण- उगवणी पूर्वी तणनाशकाचा वापर करावयाचा असल्यास Pendimethalin हे तणनाशक ५ लिटर (Stop-३० ई.सी.) किंवा आलाकुअरे (लासो ५०.ई.सी.) ३ लिटर १ हेक्टर क्षेत्राकरिता ५०० लिटर पाण्यामध्ये मिसळून अंकुर जमिनीच्या पृष्ठभागावर येण्याआधी फवारावे.

- कापणी- पिक सर्व साधारण १०० - १०५ दिवसात काढणीस तयार होते.